




दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
• छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■








●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक ३१० ●मंगळवार,दि.१० फेब्रुवारी २०२६ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955


# जिल्हापरिषद, पंचायत समिती निवडणुकीत भाजपच अव्वल



## निकालांवर मुख्यमंत्री फडणवीसांची पहिली प्रतिक्रिया, म्हणाले...

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील जिल्हापरिषद आणि पंचायत समितींच्या निवडणुकांचे निकाल आज जाहीर होत आहेत. आतापर्यंत समोर आलेल्या निकालांनुसार दोन्ही निवडणुकांमध्ये राज्यात भाजपच सर्वाधिक जागा जिंकून क्रमांक एकचा पक्ष ठरला आहे.

शिवाय, भाजपने २०१७मध्ये झालेल्या निवडणुकीचाही रेकॉर्ड मोडल्याचे समोर आले आहे. या संपूर्ण निकालावर आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी मीडियाला पहिली प्रतिक्रिया दिली आहे.

जिल्हापरिषद निवडणूक निकालावर फडणवीस काय म्हणाले? - मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, महायुतीचीच सत्ता येईल, हे आता अतिशय स्पष्ट झालेलं आहे. आपण जर बघितलं तर जवळपास सात ठिकाणी भाजप क्रमांक एकवर आहे. छत्रपती संभाजीनगर, सिंधुदुर्ग, कोल्हापूर, सांगली, धाराशिव, परभणी आणि सातारा. शिवसेना रत्नागिरी आणि रायगड या दोन ठिकाणी क्रमांक एकवर आहे. तर राष्ट्रवादी काँग्रेस पुण्यात क्रमांक एकवर आहे. याशिवाय जिथे तिन्ही पक्ष एकत्रि लढलो, अशा सोलापूर आणि लातूर मध्येही महायुतीच क्रमांक एकवर आहे. त्यामुळे मला असं वाटतं की, अतिशय चांगला असा कल समोर आलेला आहे.

▶▶ उर्वरित पान २ वर

# शरद पवार यांच्यावर उपचार सुरु

## हॉस्पिटलमधून रोहित पवारांचे मोठे आवाहन; म्हणाले सर्वांना विनंती की...

### दोन दिवस रुग्णालयात ठेवलं जाणार?

**तसेच, पवार साहेब यांना कफ झालेला आहे. पुढच्या काही काळात रिपोर्ट येतील. माझ्या अंदाजाप्रमाणे शरद पवार साहेबांना रुग्णालयातच एक ते दोन दिवस ठेवलं जाईल. कृपा करून इतर रुग्णांच्या हितासाठी कोणीही रुग्णालयात येऊ नये. पवार साहेबांशी कोणालाही भेटता येणार नाही, अशी माहितीही त्यांनी दिली.**



**पुणे । प्रतिनिधी**

खासदार शरद पवार यांची प्रकृती सध्या बिघडली आहे. कफ झाल्यामुळे त्यांना श्वसनाचा त्रास होत आहे. याच कारणामुळे त्यांना बारामतीतून तातडीने पुण्यातील रुबी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. डॉक्टरांनी त्यांच्या प्राथमिक तपासण्या केल्या आहेत. असे असतानाच आता पवार कुटुंबातील सदस्य तथा आमदार रोहित पवार यांनी शरद पवार यांच्या प्रकृतीबाबत महत्त्वाची अपडेट दिली आहे. सोबतच त्यांनी राज्यभरातील राष्ट्रवादी पक्षाच्या (शरद पवार गट) नेत्यांना आणि कार्यकर्त्यांना कोणीही पुण्यात शरद पवार यांना भेटण्यासाठी येऊ नये, असे आवाहन केले आहे.

रोहित पवार यांनी नेमकी काय माहिती दिली? शरद पवार यांनी रुबी रुग्णालयाच्या बाहेर माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधला. यावेळी ▶▶ उर्वरित पान २ वर

# छत्रपती उदयनराजेंसह शिवेंद्रराजे अन् जयकुमार गोरेंना धक्का; साताऱ्यात 'भाजप'चे विमान 'राष्ट्रवादीकडून' जमिनीवर

**सातारा । प्रतिनिधी**

सातारा जिल्हा परिषदेवर स्वबळावर वर्चस्व मिळवून जिल्ह्यातील सर्व स्थानिक स्वराज संस्थांवर वर्चस्व स्थापित करण्याचे भाजपच्या धुरीणांचे स्वप्न जिल्ह्यातील ग्रामीण मतदारांनी धुळीस मिळविले आहे. जिल्हा परिषदेच्या ६५ गटांपैकी केवळ २७ जागांवरच भाजपचे उमेदवार विजयी होऊ शकले. तसेच ११ पंचायत समितींपैकी केवळ ३ पंचायत समितींवर भाजपला बहुमत मिळाले आहे. भाजपच्या महत्वकांक्षा रोखण्यासाठी रणनीतीने लढलेल्या राष्ट्रवादी व शिवसेनेने अनुक्रमे २० व १५ गट मिळवले असून राष्ट्रवादीला ४ आणि शिवसेनला १ पंचायत समितीवर थेट सत्ता मिळणार आहे. ३ पंचायत समितींमध्ये समान बलाबल राहिले आहे. या निकालामुळे जिल्हा परिषदेत त्रिशंकू स्थिती निर्माण झाली आहे. जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी आज झालेल्या मतमोजणीत जिल्ह्यातील एकाही पक्षाला स्पष्ट बहुमत मिळवता आले नाही. एकमेकांविरोधात लढलेल्या महायुतीतील



▶▶ उर्वरित पान २ वर

# महाराष्ट्रात ७०,००० पदांची सर्वात मोठी भरती, ५०,००० पदं MPSC मार्फत भरणार; मुख्यमंत्र्यांची मोठी घोषणा

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्रात ७०,००० पदांची सर्वात मोठी नोकर भरती होणार आहे. ५०,००० पदं चझडउ मार्फत भरली जाणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सामान्य प्रशासन विभागाच्या सुधारणेसंदर्भात महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी ही घोषणा



केली. ९मुख्यमंत्री फडणवीस यांनी या बैठकीत राज्यात लवकरच होणाऱ्या नोकरभरतीची प्रक्रिया राबविताना आवश्यक कौशल्ये, सेवा प्रवेश, पात्रता आणि कामाच्या स्वरुपानुसार निर्णय घेण्याचे निर्देश दिले. राज्यात जवळपास ७०,००० हून अधिक पदांची भरती टप्प्याटप्प्याने केली जाणार असून, यामध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सुमारे ५०,००० पदे आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगाबाहेरील २०,००० पदांचा समावेश असणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले की, मनुष्यबळ व्यवस्थापन आणि भरती प्रक्रियेतील पारदर्शकतेला प्राधान्य दिले जाणार आहे. तसेच, राज्य शासनाच्या सेवा प्रवेश नियमावली सुधारणेसंदर्भातील निर्णय लवकरच मंत्रिमंडळ बैठकीत घेतला जाईल. राज्य शासनाच्या विविध विभागांमध्ये ७०,००० पदे भरल्यानंतर विभागांच्या कार्यक्षमतेत लक्षणीय वाढ होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत झालेल्या मुख्यमंत्र्यांच्या परिषदेत महाराष्ट्र शासनाने सादर केलेले मनुष्यबळ व्यवस्थापन मॉडेल सर्वाधिक प्रशंसनीय ठरले. त्यावेळी पंतप्रधान मोदी यांनी इतर राज्यांनाही हे सुधारणा ▶▶ उर्वरित पान २ वर

# महाराष्ट्रातील कनिष्ठ वकिलांसाठी मानधन योजना राबवा: खा. बजरंग सोनवणे यांची संसदेत मागणी

**नवी दिल्ली**

महाराष्ट्रातील कनिष्ठ वकिलांच्या आर्थिक अडचणी दूर करण्यासाठी स्वतंत्र मानधन (स्टायपेंड) योजना राबविण्याची मागणी खा.बजरंग मनोहर सोनवणे यांनी लोकसभेत केली आहे. शुक्रवार, ६ फेब्रुवारी रोजी लोकसभेत विचारलेल्या अतारांकित प्रश्न क्रमांक १३२६ द्वारे त्यांनी हा महत्त्वाचा मुद्दा उपस्थित केला. खा.सोनवणे यांनी म्हटले,



तामिळनाडू, आंध्रप्रदेश व झारखंड या राज्यांमध्ये कनिष्ठ वकिलांसाठी मानधन अथवा आर्थिक सहाय्य योजना राबविण्यात येत आहे. मात्र महाराष्ट्रात अद्याप अशी कोणतीही राज्यव्यापी योजना अस्तित्वात नाही, ही बाब चिंताजनक आहे. त्यांनी पुढे विचारणा केली की, भारतीय बार कौन्सिलने शहरी भागातील कनिष्ठ वकिलांना दरमहा २० हजार रुपये आणि ग्रामीण भागातील वकिलांना १५ हजार रुपये मानधन देण्याची शिफारस केली ▶▶ उर्वरित पान २ वर

# बीड जिल्ह्यात चौघांचा मृत्यू; दोघांच्या आत्महत्या, जखमी महिला दगावली तर एकाचा मृतदेह आढळला

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यातवेगवेगळ्या ठिकाणी, वेगवेगळ्या कारणांवरून चौघांचा मृत्यू झाल्याच्या दुर्दैवी घटना आज घडल्या आहेत. यामध्ये दोन तरूणांनी आत्महत्या केली असून भाजल्याने जखमी झालेल्या एका महिलेचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. तर पाडळशिंगी येथील टोलनाका परिसरात अनोळखी इसमाचे प्रेत आढळून आले आहे. बीड शहरापासून जवळच असलेल्या आहेर धानोरा येथील किरण बळीराम खेमाडे



(वय २६) याने राहत्या घरातील लोखंडी अँगलला दोरीने गळफास घेवून आत्महत्या केली आहे. ग्रामीण पोलिस घटनास्थळी दाखल झाले होते. आत्महत्येचे कारण मात्र समजू शकलेन नाही.

दुसरी घटना शिवाजीनगर पोलिस ठाणे हद्दीतील शिंदेनगर फेस-१ येथे घडली आहे. प्रविण जनार्धन जाधव (वय २७, रा.रानमाळा, ता.गेवराई, ह.मु. शिंदेनगर फेस-१) यांनीही गळफास लावून आत्महत्या केली आहे. त्याचबरोबर पाडळशिंगी (ता.गेवराई) येथील टोलनाका परिसरात अनोळखी पुरूष जातीचे प्रेत आढळून आलेआहे. त्यांना रूग्णवाहिकेमधून जिल्हा रूग्णालयात आणण्यात आले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषित ▶▶ उर्वरित पान २ वर

# डिजिटल युगातील सर्व बाबींसाठीच्या JNV Collecctives चा शुभारंभ



**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

सोशल मीडियातील घडामोडीत पुढचं पाऊल ठरणाऱ्या डिजिटल मार्केटींग , कॉन्टेन्ट क्रिएशन, इव्हेन्ट तसेच या क्षेत्राशी संबंधित सर्व सेवा उपलब्ध करून देणाऱ्या JNV Collecctive चे उद्धाटन आई सौ विजया प्रशांत दैठणकर यांच्या हस्ते करण्यात आले. जाहिरात क्षेत्रात पदव्यूत्तर प्रशिक्षण आणि विविध कार्पोरेट कंपन्या आणि सोनी टिव्ही वरील मालिकांच्या ५ वर्षांच्या अनुभवानंतर जान्हवी दैठणकर यांनी या क्षेत्रात स्वतंत्रपणे पाऊल टाकले आहे. याचा उद्घाटनाचा कार्यक्रम त्यांच्या मातोश्री विजया दैठणकर यांच्या हस्ते साध्या सोहळ्यात पार पडला. छत्रपती संभाजीनगर शहर तसेच विभागात दर्जेदार कॉन्टेन्ट आणि डिजिटल मार्केटींगसाठी आपण सुरूवात केली असून आगामी काळात सर्वांच्याच जीवनाचा अविभाज्य घटक बनणाऱ्या या क्षेत्रात अचूक आणि तत्पर सेवा देण्याचा मनोदय जान्हवी दैठणकर यांनी व्यक्त केला.

# मनोज दादा जरांगे पाटील यांच्याकडून चंपावती महोत्सवातील बालकलाकारांना कौतुकाची थाप!



## बीड जिल्ह्यातून चंपावती महोत्सवातील नृत्य स्पर्धेसाठी बालक पालकांची तोबा गर्दी!

**बीड । प्रतिनिधी**

अनिल दादा जगताप फाउंडेशन व शिवसेना बीड आयोजित चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे महाकरंडकाच्या या रंगमंचावरून मी उपमुख्यमंत्री मा. एकनाथ शिंदे साहेबांना वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा देतो. बीडच्या मातीतून घडणाऱ्या बालकलाकारांना हा महोत्सव नवी दिशा देणारा ठरो. चंपावती महोत्सवाच्या माध्यमातून बीडमधून असंख्य गुणवंत कलाकार घडू देत आणि बीड जिल्ह्याचे नाव राज्यभर मोठं व्हावं, अशी सदिच्छा व प्रार्थना व्यक्त करत संघर्ष



योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांनी बालकलाकारांचे मनोबल वाढवले.

दि. २ फेब्रुवारीपासून बीड येथे सुरू असलेल्या या महोत्सवांतर्गत शिशुगट समूह नृत्य स्पर्धा व वैयक्तिक नृत्य स्पर्धा (इंग्रजी माध्यम) यांचा उद्घाटन सोहळा काल दि. ९ फेब्रुवारी रोजी पार पडला. या सोहळ्याचे उद्घाटन मनोज दादा जरांगे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप तसेच शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते व कला रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

▶▶ उर्वरित पान २ वर




# सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना, वैंशिष्टेय व पात्रता

मागासवर्गीय समाजातील मुलींचे प्राथमिक शाळेतील गळतीचे प्रमाण कधी करण्याच्या हेतूने इ.५ वी ते इ.७ वीतील मुलींसाठी १९९५-९६ पासून शिष्यवृत्ती देण्याची योजना सुरु करण्यात आली. त्याच धर्तीवर इ.८ वी ते इ. १० वी मधील मुलींचे गळतीचे प्रमाण कमी करण्याच्या दृष्टीने २००३-०४ सालापासून सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना सुरु करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

मागासवर्गीय समाजातील मुलींचे प्राथमिक शाळेतील गळतीचे प्रमाण कधी करण्याच्या हेतूने इ.५ वी ते इ.७ वीतील मुलींसाठी १९९५-९६ पासून शिष्यवृत्ती देण्याची योजना सुरु करण्यात आली. त्याच धर्तीवर इ.८ वी ते इ. १० वी मधील मुलींचे गळतीचे प्रमाण कमी करण्याच्या दृष्टीने २००३-०४ सालापासून सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना सुरु करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्याअंतर्गत इ.८ वी ते इ. १० वी पर्यंत शिक्षण घेत असलेल्या अनुसूचित जातीच्या मुलांना प्रत्येक शैक्षणिक वर्षात जून ते मार्च असे दहा महिने रुपये १०० /- प्रमाणे शिष्यवृत्ती मिळते.या शिष्यवृत्ती योजनेमुळे ग्रामीण भागातील दलित विद्यार्थीनीला दरमहा रु.१०० /- मिळणार आहेत. ज्या घरात मुलगी म्हणजे ओझे समजले जाते अशा घरात तिला आता न्याय मिळू शकेल. मुलींचे सक्षमीकरण कारणे हा या योजनेमागचा हेतू आहे.

शिष्यवृत्तीसाठी अटी

सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना जिल्हा परिषद, नगरपालिका, महापालिका, अनुदानित,विनानुदानित, माध्यमिक शाळेतील इ.८ वी ते इ. १० वी च्या मुलींसाठी असून ती गुणवत्ता शिष्यवृत्ती व्यतिरिक्त राहील. यासाठी मागासवर्गीय मुलींना उत्पन्नाची अट राहणार नाही. परंतु शाळेतील उपस्थिती नियमित असणे आवश्यक आहे. उपस्थितीनुसार शिष्यवृत्ती दिली जाते. या शिष्यवृत्तीसाठी मुलींना अर्ज करण्याची आवश्यकता नाही.

योजनेचा उद्देश - शासन निर्णय दिनांक १२ जानेवारी, १९९६ अन्वये मागास समाजातील विद्यार्थिनींसाठी व शासन निर्णय दिनांक २९ ऑक्टोबर, १९९६ पासून विमाप्र प्रवर्गाच्या विद्यार्थीनींना सुध्दा लागू करण्यात आली आहे. सदर प्रवर्गाच्या विद्यार्थीनींचे गळतीचे प्रमाण कमी करण्यांसाठी प्रोत्साहनपर अनुदान म्हणून ही शिष्यवृत्ती दिली जाते.

योजना ज्या प्रवर्गासाठी लागू आहे त्याचे नाव - विमुक्त जाती व भटक्या जमाती/ विशेष मागास प्रवर्ग.

योजनेच्या प्रमुख अटी- विद्यार्थीनी विजाभज / विमाप्र या प्रवर्गातील असावी.

विद्यार्थीनी इ. ५ वी ते ७ वी मध्ये शिकणारी असावी.

विद्यार्थीनी ही शासन मान्य शाळेत नियमित शिकणारी असावी.

योजनेचे स्वरुप -

इयत्ता ५ वी ते ७ वी मध्ये शिकणाऱ्या अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती व इ. ८ वी ते १० वी मध्ये शिकणाऱ्या अनुसूचित जातीच्या मुलींच्या गळतीचे प्रमाण कमी व्हावे, या उद्देशाने अनुक्रमे सन १९९६ व २००३ पासून सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना सुरु करण्यात आली आहे. इयत्ता, शिष्यवृत्ती दर व कालावधी.

५ वी ते ७ वी दरमहा ६० रुपये प्रमाणे १० महिन्याचे ६०० रुपये.

८ वी ते १० दरमहा १०० रुपये प्रमाणे १० महिन्याचे १००० रुपये अदा केले जातात.

नियम, अटी व पात्रता इ. :

उत्पन्न व गुणाची अट नाही.

संबंधित शाळेच्या मुख्याणद्यापकांनी विद्यार्थ्यांबचे अर्ज ऑनलाईन भरणे आवश्येक.

७५% उपस्थिती असल्यास शाळेने प्रस्ताव विहीत कालावधीत सादर करावा.

लाभधारक मुलगी शासनमान्य शिक्षण संस्थेत नियमित शिकत असावी. सदर शिष्यवृत्तीची रक्कम त्या त्या मुलींच्या बँकेतील खात्यामध्ये/ ऑनलाईन जमा करण्याषत येते.

दिल्या जाणा-या लाभाचे स्वरुप

प्रति विद्यार्थीनीस दरमाह रुपये ६०/- याप्रमाणे १० महिन्या करीता रु.६००/- शिष्यवृत्तीची रक्कम संबंधीत लाभार्थ्यांस अदा केली जाते.

अर्ज करण्याची पध्दत

सदर योजनेचे संगणकीकरण झालेले असून ऑनलाईन फॉर्म भरण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांनी https://mahaeschol.maharashtra.gov.in या वेबसाईटवर या योजनेंतर्गत पात्र विद्यार्थिनींचे अर्ज / माहिती भरुन संबंधित जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांचेकडे सादर करावेत.

# 'नोटा' दरवेळी उपेक्षित !

वर्ष २०१३ पासून निवडणूक प्रशासनाने मतदारांसाठी ईव्हीएम यंत्रामध्ये सर्वात शेवटी 'नोटा' चे बटन उपलब्ध करून दिले आहे. निवडणुकीसाठी उभे राहिलेल्या मतदारांपैकी कोणताच उमेदवार आपल्याला पात्र वाटत नसेल तर 'नोटा' चे बटन दाबून मतदार आपला मतदानाचा हक्क बजावू शकतात. २०२४ मध्ये पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत देशभरात ६७ लाख ८८ हजार ४९२ मतदारांनी नोटाचे बटन दाबून त्यांच्या त्यांच्या क्षेत्रात निवडणुकीत उभे राहिलेले उमेदवार पात्र नसल्याचे मत व्यक्त केले. हा आकडा याआधीच्या लोकसभा निवडणुकीच्या तुलनेत २ लाख ७५ हजार १३७ ने वाढला होता. २०२४ मध्येच झालेल्या राज्याच्या विधानसभा निवडणुकीत ४ लाख ६१ हजार ८६६ मतदारांनी नोटाला मतदान करण्याचा पर्याय निवडला होता. नुकत्याच झालेल्या महापालिका निवडणुकीच्या अंतर्गत एकट्या मुंबई जिल्ह्यात तब्बल एक लाख ३२७ मतदारांनी नोटाला मतदान केले. हा आकडा एकूण मतदानाच्या जवळपास दोन टक्के इतका आहे. अन्य महापालिका निवडणूक क्षेत्रातील जवळपास तेव्हढ्याच प्रमाणात नोटाला मतदान झाले आहे. मतदान प्रक्रियेतील 'नोटा' या पर्यायाचा मतदारांकडून वाढता वापर बरेच काही सांगून जातो. काही मतदारसंघांमधे विजयी उमेदवाराचे मताधिक्य पाहता ते त्या मतदारसंघातील 'नोटा' मतदानाहून अल्प असल्याचे लक्षात येते. अशा ठिकाणी 'नोटा' पर्यायाचा वापर करणाऱ्यांनी जर उमेदवारांपैकी कोणाला मतदान केले असते, तर तेथील निवडणुकांचा निकाल वेगळाच लागला असता. निवडणुकीचा निकाल लागल्यावर नोटा पर्यायाचा वापर करणाऱ्यांची केवळ संख्या सांगितली जाते; मात्र कोणताही पक्ष त्याकडे गांभीर्याने पाहत नाही, त्यामुळे निवडणूक आयोगाने उपलब्ध करून दिलेल्या 'नोटा' पर्यायाचा उद्देश साध्य होत नसल्याचे दिसून येत आहे. मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी निवडणूक प्रशासनासह राज्य सरकार, केंद्र सरकार, स्वयंसेवी संस्था, संघटना, राजकीय पक्ष विविध माध्यमांतून जनजागृती करत असतात. असे असतानाही बहुतांश निवडणूक क्षेत्रांमध्ये सरासरी ५० ते ६० टक्यांच्या दरम्यान मतदान होते. ४० ते ५० टक्के जनता अद्यापही मतदान करण्यासाठी घराबाहेर पडण्याची तसदी घेत नसल्याचे चित्र यंदा महापालिका निवडणुकीतही पाहायला मिळाले. अशा स्थितीत समाजातील एक जागरूक वर्ग जो आपले राष्ट्रीय कर्तव्य म्हणून मतदानासाठी घराबाहेर पडतो, रांग लावून 'नोटा'ला मतदान करतो. अशा वर्गाचा विचार राजकीय पक्ष केव्हा करणार आहेत ? या नागरिकांना आपल्याकडून काय अपेक्षित आहे, जे त्यांना देण्यामध्ये आपण कमी पडत आहोत का ? आपण जो उमेदवार दिला आहे त्याची गुन्हेगारी पार्श्वभूमी नागरिकांना खटकते आहे का ? निवडणूकीतील आपली प्रचाराची पद्धती या लोकांना पटत नाही का ? आपल्या पक्षाची तत्वे आणि विचारधारा यांना मान्य नाही का ? आपण दिलेल्या आश्वासनांची पूर्ती आपण करू यावर यांचा विश्वास नाही का ? की याहून काही वेगळे कारण आहे याबाबतचे चिंतन राजकीय पक्ष करणार आहेत की नेहमीप्रमाणे लागलेल्या निकालावर संतुष्टता मानून पुढच्या निवडणुकांच्या सिद्धतेते व्यस्त होणार आहेत ? महापालिका निवडणुकीत जे चित्र दिसले तेच चित्र जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांमध्येही दिसेल यात शंका नाही. जगातील सर्वात मोठे लोकशाही राष्ट्र म्हणून आज आपल्या देशाची ओळख आहे. या लोकशाही राष्ट्रातील एक मोठा वर्ग नोटाचा पर्याय वापरून पक्षांनी उभे केलेल्या उमेदवारांना नाकारत आहे आणि ही मतदानाची आकडेवारी दर निवडणुकांगणिक वाढत असूनही या वर्गाचा विचारच केला जात नाही हे लोकशाहीसाठी घातक असून निवडणूक आयोगासह राजकीय पक्षांनी याबाबत गांभीर्याने विचार करण्याची आवश्यकता आहे.

**- जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**

◆ पान १ वरून पुढे...

## जिल्हापरिषद, पंचायत...

भाजपने आपला २०१७चा रेकॉर्ड तोडलेला आहे. २०१७ साली ज्या जिल्हापरिषदांमध्ये भाजपला १४१ जागा होत्या, आता अजून निकाल पूर्ण व्हायचे आहेत. परंतु घोषित झालेल्या निकालांमध्येहीन २३६ जागा भाजपला मिळालेल्या आहेत आणि भाजप क्रमांक एकचा पक्ष म्हणून समोर आला आहे.

पंचायत समिती निकालावर काय म्हणाले? - आपण जर पंचायत समिती चा विचार केला, तर आतापर्यंत घोषित झालेल्या जागांमध्ये २०१७मध्ये भाजपला एकूण सगळ्या जागा मिळून २८४ जागा होत्या, पण आतापर्यंतचा जो कल आहे त्यात ४०६ जागा भाजपला मिळालेल्या आहेत... त्यामुळे मला असं वाटतं की भाजपने एक मोठी उडी मारलेली आहे. अशाचप्रकारे आमच्या मित्रपक्षांनाही चांगल्या जागा मिळालेल्या आहेत. साधारणपणे आपण जर १२५ पंचायत समितीचा जर कल बघितला, तर या १२५ पैकी ५० पंचायतसमिती भाजपकडे असतील. २६ शिवसेनेकडे असतील आणि २३ राष्ट्रवादी काँग्रेसकडे असतील. बाकी मग आपण जर बघितलं तर सात ते आठ काँग्रेसकडे, सात ते आठ शरद पवार यांच्या पक्षाकडे आणि ठाकरे गटाकडे पाच अशा पद्धतीची आताची परिस्थिती आहे. त्यामुळे इथेही महायुतीला १२५ पैकी १०० पेक्षाही जास्त पंचायत समिती जिंकता आलेल्या आहेत.

## शरद पवार....

बोलताना शरद पवार यांच्या प्रकृतीबाबत चिंता करण्याचे कारण नाही, असे त्यांनी सांगितले आहे. मी सर्व कार्यकर्त्यांना विनंती करतो की कोणीही हॉस्पिटलला येऊ नये. रुग्णालयात इतरही काही रुग्ण आहेत. डॉक्टरांनी सांगितले सांगितल्याप्रमाणे शरद पवार हे आयसीयूमध्ये नाहीयेत. एका प्रायव्हेट रुममध्ये त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. मी स्वत:चर्चा करून आलेलो आहे. त्यामुळे चिंतेचं कोणतंही कारण नाहीये. गेल्या १२ ते १३ दिवसांत शरद पवार यांचा शारीरिक ताण वाढला आहे, असे रोहित पवार यांनी सांगितले.

उपचारासाठी मुंबईत नेले जाणार का? - या रुग्णालयाचे जे नियम आहेत ते योग्य पद्धतीने पाळले पाहिजे, असे सुप्रिया सुळे यांनी सांगितले आहे. तपासणीचे रिपोर्ट समोर आल्यावरच शरद पवार यांच्यावर पुण्यातच उपचार केले जाणार की त्यांना मुंबईत नेले जाणार हे ठरवले जाईल, असेही यावेळी रोहित पवार यांनी स्पष्ट केले.

## छत्रपती उदयनराजेंसह...

घटक पक्षांना एकत्रित जागा मिळाल्या आहेत. जिल्हा परिषदेवर भाजपचा झेंडा फडकविण्याच्या प्रयत्नात स्वबळावर लढणाऱ्या भाजपला अवघ्या २७ जागा मिळाल्या आहेत. तर जिल्हा परिषदेतील सत्ता कायम ठेवण्यासाठी एकत्र आलेल्या दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसला गेल्यावेळपेक्षा निम्म्याच जागा मिळाल्या आहेत. एकनाथ शिंदेंच्या शिवसेना पालकमंत्री शंभूराज देसाई यांच्या नेतृत्वाखाली १५ जागा मिळवत जिल्हा परिषदेच्या सत्तेतील महत्वाचा पक्ष ठरला आहे.

## महाराष्ट्रात ७०,०००...

मॉडेल स्वीकारण्याचे निर्देश दिले. यामुळे प्रशासन सुधारणा क्षेत्रात महाराष्ट्र राज्य देशासाठी मार्गदर्शक ठरत आहे असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. राज्य प्रशासनातील महत्त्वाच्या विभागांमध्ये सर्वांगीण प्रशासन सुधारणा वेगाने राबविण्यात याव्यात. तसेच, भरती प्रक्रियेत अनावश्यक कागदपत्रे, लांब रांगा आणि विलंब टाळण्यासाठी ऑनलाईन व डिजिटल व्हेरिफिकेशन मॉडेल विकसित करण्यावर भर देण्याचे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिले. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, पासपोर्टसारख्या संवेदनशील दस्तऐवजांची ऑनलाईन पडताळणी शक्य असल्यास, इतर प्रक्रियांमध्येही हे मॉडेल वापरता येईल. यासाठी प्रत्येक विभागाने ब्लॉकचेन पद्धतीबरोबरच डिजिलॉकर प्रणालीत प्रमाणपत्रे उपलब्ध करून देण्यासाठी योग्य ती व्यवस्था करावी. संपूर्ण भरती प्रक्रिया पारदर्शक आणि विश्वासार्ह असावी. येणाऱ्या एका वर्षात महाराष्ट्रात गव्हर्नन्स रिफॉर्मचे नवे मॉडेल उभे राहील, ज्यामध्ये प्रत्येक विभागाची भूमिका महत्त्वाची असेल. कोणताही विभाग मागे न राहता सर्वांनी एकत्र येऊन प्रशासन सुधारणा यशस्वी कराव्यात, असेही निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले. यावेळी मुख्य सचिव तसेच संबंधित वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## महाराष्ट्रातील कनिष्ठ...

आहे, त्या शिफारसीवर शासनाने काय कार्यवाही केली आहे का?, निश्चित उत्पन्न नसल्यामुळे कनिष्ठ वकिलांना घरभाडे, प्रवास खर्च, अभ्यास साहित्य यांसारख्या मूलभूत गरजांसाठी मोठ्या आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे अनेक होतकरू युवक-युवतींना वकिली व्यवसायात टिकून राहणे कठीण होत आहे. या प्रश्नाला उत्तर देताना केंद्रीय कायदा व न्याय राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) अर्जुन राम मेघवाल यांनी सांगितले, भारतीय बार कौन्सिलला कनिष्ठ वकिलांच्या आर्थिक अडचणींची जाणीव असून, त्याबाबत सर्व राज्य बार कौन्सिलांना किमान मानधनाबाबत शिफारसी करण्यात आल्या आहेत. महाराष्ट्रात अशी योजना राबविण्यासाठी राज्य शासन व राज्य बार कौन्सिल स्तरावर स्वतंत्र अंमलबजावणी यंत्रणा व अर्थसंकल्पीय तरतूद आवश्यक आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, खा.बजरंग सोनवणे यांनी महाराष्ट्रातही लवकरात लवकर कनिष्ठ वकिलांसाठी मानधन योजना लागू करण्यात यावी, अशी मागणी केली असून, या मुद्द्यावर सातत्याने पाठपुरावा करणार असल्याचे संकेत दिले आहेत.

## बीड जिल्ह्यात ...

केले आहे. सदरील मयताची ओळख पटविण्यासाठी पोलिसांकडून कार्यवाही करण्यात येत आहे. चौथी घटना ताडसोन्ना येथील असून यमुनाबाई बळीराम मुंडे (वय ६५) या दि.६ फेब्रुवारी रोजी वडवणी येथील बहिणीकडे गेल्या होत्या. त्याठिकाणी दिवा लावत असतांना साडीने पेट घेतल्याने यमुनाबाई मुंडे यांना जिल्हा रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. मात्र काल रात्री उपचार सुरू असतांना त्यांचा मृत्यू झाला. शवविच्छेदन अहवालानंतरच त्याची सविस्तर माहिती समोर येईल असे डॉ३टरांनी सांगितले.

## मनोज दादा जरांगे...

कार्यक्रमाची प्रस्तावना चंपावती महोत्सवाचे संस्थापक अध्यक्ष प्रतीक कांबळे यांनी करून महोत्सवाची सविस्तर माहिती उपस्थितांना दिली. आपल्या भाषणात अनिल दादा जगताप यांनी सांस्कृतिक रंगमंचावर बालकलाकारांचे कौतुक करण्यासाठी मनोज दादा जरांगे पाटील यांची उपस्थिती लाभल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

या उद्घाटन सोहळ्याला सरपंच पांडुरंग तारक, धनंजय देशमुख, बबनराव गवते, बळीराम गवते, झुंजार नेता चे संचालक आकाश वरपे सौ. विशाखा वरपे, ज्ञानराज तारक, बद्रीनाथ तारक, श्रीराम कुनरकर, स्वप्निल तारक, जयदत्त थोटे, संजय गोडसे, युवराज मस्के, किरण भगत, लक्ष्मण नरनाळे, महेश तारक, गंगाधर काळकुटे, शंकर चव्हाण यांच्यासह असंख्य मराठा सेवक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. चंपावती महोत्सवाच्या माध्यमातून बीडच्या सांस्कृतिक क्षेत्राला नवी दिशा मिळत असून बालकलाकारांच्या सुप्त कलागुणांना योग्य व्यासपीठ मिळत असल्याचे चित्र या उद्घाटन सोहळ्यातून पुन्हा एकदा अधोरेखित झाले.

◆ पान ४ वरून पुढे...

## उच्च माध्यमिक....

पुरविण्यासाठी दुरुपयोग होण्याची शक्यता लक्षात घेता, परिक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना व परिक्षेसाठी नियुक्त अधिकारी, कर्मचा-यानां बाहेरील व्यक्तींचा त्रास होऊ नये, तसेच जिल्हयात कॉपीमुक्त अभियान राबविण्यासाठी जिल्हयातील फेब्रुवारी, मार्च २०२६ मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परिक्षा व माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा केंद्राचे १०० मिटर परिसरात परिक्षेचे साहित्य ठेवण्यात आलेल्या ठिकाणी शांतता व सुव्यवस्था अबाधित रहावी व अनाधिकृत कृत्य होऊ नयेत याकरिता खालील कृत्य करण्यास मनाई भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ नुसार आहे हे आदेश परिक्षेच्या कामकाजासाठी नियुक्त अधिकारी व कर्मचारी यांना लागू राहणार नाही.परिक्षा केंद्राबाहेर व परिसरात परिक्षेसाठी नियुक्त अधिकारी, कर्मचारी अणि परिक्षार्थी यांना वगळून दोन किंवा दोनपेक्षा जास्त व्यक्ती एकत्र येण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. परिक्षा केंद्राचे १०० मी परिसरातील सर्व झेरॉक्स केंद्र, फॅक्स केंद्र व ध्वनीक्षेपक ईत्यादी परीक्षा सुरु होण्याच्या एक तास अगोदर पासून ते परीक्षा पेपर संपेपर्यंतच्या कालावधीपर्यंत चालू ठेवण्यासाठी प्रतिबंध करण्यात आला आहे. शासकीय आणि परिक्षेसंबंधीत कर्मचाऱ्यांच्या व विद्यार्थ्यांच्या वाहनाव्यतिरीक्त इतर अनाधिकृत वाहनांना परिक्षा केंद्राच्या १०० मिटर परिसरात येण्यास प्रतिबंध आहे. सदर आदेश कोणत्याही धार्मिक कार्यक्रम, मयताची अंत्ययात्रासाठी लागू राहणार नाहीत.हे आदेश बीड जिल्हयाच्या हद्दीतील उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परिक्षा व माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा केंद्राचे १०० मीटर परिसरात व परीक्षा साहित्य ठेवलेल्या ठिकाणी दि.१० फेब्रुवारी २०२६ ते दि.१८ मार्च २०२६ या कालावधीत त्या-त्या दिवशीच्या परिक्षेच्या वेळेच्या एक तास अगोदर ते परीक्षा पेपर संपेपर्यंतच्या कालावधीसाठी लागू राहातील, असे अपर जिल्हादंडाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

## 'आदित्य पॉलिटेक्निक'च्या...

दिली. अशा उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचा शैक्षणिक, मानसिक व सामाजिक विकास साधण्यास निश्चितच मदत होईल असे ते म्हणाले. सदरील कार्यक्रमास विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची प्रस्तावना विभाग प्रमुख अजय दुधाळ यांनी केली. आभार प्रा.शिंदे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा.अजय दुधाळ, प्रा.गोंटे, प्रा.जाधव, प्रा.मिनाज शेख यांनी परिश्रम घेतले.

मन सुदृढ असेल तर ध्येय साध्य करता येते- अतुल बडवे

विद्यार्थांना मार्गदर्शन करताना अतुल बडवे म्हणाले की, जसे आपण आपल्या शरीराची काळजी घेतो, तशी आपण आपल्या मनाची देखील काळजी घेतो का? शारीरिक आरोग्यासोबत आपले मानसिक आरोग्य देखील सांभाळता आले पाहिजे. मनाला त्रास झाला की त्याचा परिणाम तुमच्या दैनंदिन गोष्टीवर होतो. परिणामी यश तुम्हाला मिळत नाही. मन सुदृढ असेल तर बऱ्याच गोष्टी आपल्याला साध्य करता येतात. एखाद्या गोष्टीवर अति विचार करणे हे देखील मानसिक आरोग्यासाठी घातक आहे. आपण स्वतःला डिप्रेशन मध्ये जाण्यापासून रोखले पाहिजे. मित्र परिवार यांच्यासोबत वेळ घालवला पाहिजे. कोणी जर नैराश्याच्या स्थितीत असेल तर त्याला सहकार्य करून नैराश्याच्या स्थितीतून बाहेर आनले पाहिजे. असे ते म्हणाले.

मानसिक आरोग्य ही काळाची गरज- अजय दुधाळ

आजच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांवर शैक्षणिक तसेच वैयक्तिक ताण मोठ्या प्रमाणात वाढत आहे. अशा परिस्थितीत मानसिक आरोग्य सुदृढ ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. व्यक्तिमत्त्व विकासासोबतच सकारात्मक विचारसरणी आणि आत्मविश्वास वृद्धी यामुळे विद्यार्थी जीवनात यशस्वी होऊ शकतात. या उद्देशानेच 'व्यक्तिमत्त्व विकास व मानसिक आरोग्य' या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी अशा उपक्रमांचा लाभ घेऊन स्वतःच्या मनाची काळजी घ्यावी आणि अडचणीच्या प्रसंगी मार्गदर्शन घेण्यास अजिबात संकोच करू नये, असे मत विभाग प्रमुख अजय दुधाळ यांनी व्यक्त केले.

## शनी मंदिराच्या....

तसेच, आदेशासाठी बंद असलेल्या प्रकरणात कोणताही कायदेशीर आदेश नसताना स्थळ पाहणी करणे हे प्रक्रियात्मक कायद्याच्या विरोधात असल्याचा दावा विश्वस्तांकडून करण्यात आला आहे. या घटनेमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असल्याने संबंधितांवर योग्य कारवाई करण्याची मागणी होत आहे. याप्रकरणी उपसंचालक छत्रपती संभाजीनगर, पोलीस अधीक्षक तसेच स्थानिक पोलीस ठाण्यात स्वतंत्र तक्रारी दाखल करण्यात आल्या असून पुढील चौकशीची मागणी करण्यात आली आहे.

## मच्छिंद्रनाथ संजीवन...

संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. बैठकीत भाविकांच्या सोयीसुविधांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. यामध्ये दर्शन रांग व्यवस्था, व्हीआयपी दर्शन व्यवस्था, पार्किंग व्यवस्था, मोफत अन्नदान, कावड व्यवस्था, मळी काढणे, सुरक्षा व्यवस्था, विद्युत व पाणीपुरवठा, आरोग्य सेवा तसेच इतर आवश्यक व्यवस्थांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. भाविकांना कोणतीही गैरसोय होऊ नये यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने व जबाबदारीने काम करण्याच्या सूचना देण्यात आल्या. गुढीपाडव्याच्या पूर्वसंध्येला संजीवन समाधी उघडण्यात आल्यानंतर दुसऱ्या दिवशी सूर्योदयापूर्वी ती पुन्हा झाकण्यात येते. या कालावधीत मच्छिंद्रनाथांच्या संजीवन समाधीवर गंगाजल व चंदनाने अभिषेक करण्यात येतो. यावेळी मोठी यात्रा भरत असून हा सोहळा नाथभक्तांसाठी श्रद्धा व भक्तीचा केंद्रबिंदू ठरतो. नाथ संप्रदायातील ही प्राचीन अध्यात्मिक परंपरा श्रद्धा व भक्तीचे प्रतीक मानली जाते. श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ गड, सावरगाव मायंबा हे नाथ संप्रदायातील अत्यंत महत्त्वाचे तीर्थक्षेत्र असून या संजीवन समाधी सोहळ्याला विशेष धार्मिक महत्त्व आहे.

## हेल्मेट सक्ती....

अधिकाऱ्यांवर कठोर प्रशासकीय व दंडात्मक कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.

प्रमुख मागण्या- प्रविण सुमंत व राजेंद्र भोपळे यांच्यावर प्रशासकीय व दंडात्मक कारवाई करावी. राष्ट्रीय महामार्गांवरील निकृष्ट रस्ताकामाची सखोल चौकशी करावी. दोषी कंत्राटदारांवर कठोर कारवाई करावी. बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते नगरनाका दरम्यान दुभाजकात यू-टर्न सुविधा उपलब्ध करून द्यावी.

वरिष्ठ स्तरावर निवेदन- या आंदोलनानंतर जिल्हाधिकाऱ्यांमार्फत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, राज्यपाल, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री तसेच राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या प्रकल्प संचालकांना निवेदन सादर करण्यात आले.

आंदोलनात सहभागी- या आंदोलनात माहिती आधिकार कार्यकर्ते शेख युनुस, सुदाम तांदळे, शेख मुबीन, माजी सैनिक अशोक येडे( जिल्हाध्यक्ष आम आदमी पार्टी),रामधन जमाले (जिल्हाध्यक्ष इंटक बीड) नितीन सोनावणे ( जिल्हाध्यक्ष ऑल इंडिया पँथर सेना), सय्यद सादेक (बीड शहराध्यक्ष आम आदमी पार्टी)यांच्यासह अनेक सामाजिक कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## स्वातंत्र्य सैनिक....

राजेंद्र कुंभार, डॉ सुभाष चव्हाण,धर्मराज वीर,व ग सुर्यवंशी यांच्यासह असंख्य मान्यवरांच्या उपस्थितीत ग्रंथमित्र पुरस्कार देवुन सन्मानित करण्यात आले. बीड जिल्हात शासनाच्या गाव तिथे ग्रंथालय! या धोरणानुसार गावा गावात ग्रंथालय चळवळ उभारली जावी यासाठी गेल्या ३५वर्षापासुन ग्रंथालय क्षेत्रात रचनात्मक कार्य करणाऱ्या ग्रंथप्रेमी डॉ राजेंद्र सानप यांना राज्यस्तरीय ग्रंथमित्र या पुरस्कार मिळाल्याबद्दल विविध क्षेत्रातुन त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे

या कार्यक्रमास प्रा विलास वैद्य, राजेंद्र हंबीरे, धनंजय पवार,नरहरी मंठेकर, शेख इब्राहिम,धनंजय सानप, धम्मपाल वैद्य यांच्या सह असंख्य उपस्थितीत होते

## आजपासुन बारावी...

कर्मचारी यांना बाहेरील व्यक्तींचा त्रास होऊ नये इयत्ता

व दहावीच्या परिक्षा केंद्राच्या ठिकाणी व परिक्षा केंद्राच्या १०० मिटर परिसरात फौज्दारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (२) करण्यात आले आहे. या परीक्षा केंद्राच्या परिसरात १४४ कलम जारी केला असून परीक्षा केंद्राच्या परिसरात १०० मीटर अंतरापर्यंत शासकीय कर्तव्ये पार पाडणाऱ्या

अधिकारी, कर्मचारी, परीक्षार्थी यांच्या व्यवतिरिक्त दोन किंवा त्यापेक्षा जास्त व्यक्ती एकत्र येण्यास, फोटोकॉपी, ई-मेल, इंटरनेट सुविधा, इतर दळणवळण, संदेश वहन साधने तसेच कोणत्याही व्यक्तीजवळ मोबाईल, वायरलेस सेट, कॅल्क्युलेटर, लॅपटॉप, संगणक बाळगण्यास, एस.टी.डी, आय.एस. डी मशिन, ध्वनीक्षेपक वाजविण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. शासकीय परिक्षेसंबधीत कर्मचाऱ्यांच्या व विद्यार्थ्यांच्या वाहना व्यतिरीक्त इतर अनाधिकृत वाहनांना परिक्षा केंद्राच्या १०० मिटर परिसरात येण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. हे आदेश कोणत्याही धार्मिक कार्यक्रम तसेच अंत्ययात्रा यासाठी लागू राहणार नाहीत.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# केवळ पैसा कमावणारा व्यक्ती न होता जबाबदार नागरिक बना: सपोनि सुभाष सानप

## तुलसी व माता रमाई नर्सिंग तसेच ज्युनिअर कॉलेजचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न







**बीड । प्रतिनिधी**

आजचा विद्यार्थी हा उद्याचा समाज घडवणारा नागरिक असल्याने केवळ पैसा कमावणारी व्यक्ती होण्यापेक्षा समाजासाठी उपयुक्त व जबाबदार नागरिक बनणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन बीड वाहतूक विभागाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सुभाष सानप यांनी केले.तुलसी शैक्षणिक समूह संचालित तुलसी नर्सिंग कॉलेज, माता रमाई नर्सिंग कॉलेज व तुलसी ज्युनिअर कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित वार्षिक स्नेहसंमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी ते मुख्य मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

महाविद्यालयाच्या प्रांगणात पार पडलेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी देवगिरी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रा. प्रदीप रोडे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस हवालदार त्रिंबक कुडके, प्रा.अर्जुन राठोड, डॉ.सुनील जोंधळे, प्रा.राम गायकवाड, प्रा.शरद वंजारे, प्रा.डी. जी.निकाळजे, प्रा.डी.डी.राऊत तसेच प्रा.प्रकाश ढोकणे उपस्थित होते. यावेळी सुभाष सानप म्हणाले की, विद्यार्थी वर्षभर अभ्यासाच्या ताणतणावात व्यस्त असतात. स्नेहसंमेलनासारख्या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना आनंददायी वातावरण मिळते तसेच विद्यार्थ्यांमध्ये परस्पर ओळख वाढून प्राध्यापक व विद्यार्थ्यांमधील संवाद अधिक दृढ होतो. विविध सांस्कृतिक व शैक्षणिक उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना एकमेकांचे गुण आत्मसात करण्याची संधी मिळते, असे त्यांनी सांगितले.

ते पुढे म्हणाले की, आजचे विद्यार्थी हे उद्याच्या भारताचे शिल्पकार आहेत. महाविद्यालयाचे उद्दिष्ट केवळ पदवी प्रदान करणे नसून विद्यार्थ्यांच्या अंगभूत कलागुणांना वाव देणेही तितकेच महत्त्वाचे आहे. अनेक ठिकाणी पारंपरिक शिक्षणपद्धतीवर भर दिला जात असताना आपल्या संस्थेत नाविन्यपूर्ण उपक्रम राबवले जात असून त्याचा विद्यार्थ्यांना मोठा लाभ होत आहे. बदलत्या काळानुसार रटाळ शिक्षणापेक्षा नवीन कौशल्ये आत्मसात करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.तसेच विद्यार्थ्यांनी अपघात टाळण्यासाठी वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन त्यांनी केले. अध्यक्षीय भाषणात प्रा. प्रदीप रोडे यांनी विद्यार्थ्यांना शिस्त, वेळेचे नियोजन आणि दृढ इच्छाशक्ती यांच्या बळावर कोणतेही ध्येय साध्य करता येते, असा प्रेरणादायी संदेश दिला. जगात बदल घडवायचा असेल तर त्याची सुरुवात स्वतःपासून करण्याचे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी दीपप्रज्वलन व प्रतिमा पूजन करण्यात आले. प्राचार्य डी.डी.राऊत यांनी संस्थेच्या प्रगतीचा आढावा सादर केला. यावेळी शैक्षणिक, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यानंतर विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांचे मन जिंकले.लावणी,आदिवासी व कोळीगीत तसेच देशभक्तीपर गीतांवरील नृत्य सादरीकरणांनी कार्यक्रमात विशेष रंगत आणली. विविध सादरीकरणातून विद्यार्थ्यांनी आपल्या सुप्त कलागुणांचे उत्कृष्ट दर्शन घडवले. कार्यक्रमास महाविद्यालयाचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

## अशोक उच्च माध्यमिक विद्यालयात बारावी परीक्षेची तयारी पूर्ण



**वडवणी । प्रतिनिधी**

तालुक्यातीलअशोक उच्च माध्यमिक विद्यालय, चिंचाळा येथे इयत्ता बारावीच्या परीक्षेसाठी आज दि. १० फेब्रुवारी २०२६ रोजी आवश्यक त्या सर्व बैठक व्यवस्थेची तयारी पूर्ण करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना परीक्षेदरम्यान कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी केंद्र संचालक सावंत बी.आर. यांच्या नेतृत्वात शाळा प्रशासनाच्या वतीने योग्य नियोजन करण्यात आले आहे. परीक्षा केंद्रावर १५ हॉलमध्ये रोल नंबर प्रमाणे विद्यार्थ्यांची बैठक व्यवस्था , स्वच्छता, प्रकाश व्यवस्था, आसन मांडणी तसेच शांत व शिस्तबद्ध वातावरण राखण्यावर विशेष भर देण्यात आला आहे. परीक्षा सुरळीत पार पडावी यासाठी शिक्षक व कर्मचार्यांची नेमणूक करण्यात आली असून संबंधित नियमांचे काटेकोर पालन केले जाणार आहे. शाळा प्रशासनाने विद्यार्थ्यांना वेळेवर परीक्षा केंद्रावर उपस्थित राहण्याचे तसेच आवश्यक साहित्य सोबत आणण्याचे आवाहन केले आहे. बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी ही महत्त्वाची परीक्षा असल्याने पालक व शिक्षक वर्गाकडूनही शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.

## संत सोपान काका मंदिरात महाशिवरात्री महोत्सव्वा निमित्त ; शिवपुराण कथा व शिवलीला अमृत पारायण सोहळ्याच्या आयोजन






**परळी । प्रतिनिधी**

येथील श्री संत सोपान काका मंदिरात महाशिवरात्री महोत्सवानिमित्त शिवम महापुराण कथा व शिवलीला अमृत पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून श्री ह भ प मारुती महाराज लातूरकर यांच्या मधुर वाणीतून शिवपुराण कथेचे श्रवण करण्याचा योग परळीकरांना आला आहे तरी परळी पंचक्रोशीतील भाविकांनी या शिवप्राण कथा व शिवलीला अमृत पारायण सोहळ्याचा लाभ घ्यावा तसेच जास्तीत जास्त भाविकांनी पारायण सोहळ्यास बसण्यासाठी मोठ्या प्रमाणात सहभाग घ्यावा असे आवाहनही उखळीकर फडाच्या वतीने करण्यात आले आहे.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी महाशिवरात्रीनिमित्त श्री संत सोपान काका मंदिरात दिनांक १२ ते १६ फेब्रुवारी दरम्यान शिवपुराण कथा व शिवलीला अमृत पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे लातूर येथील प्रसिद्ध कीर्तनकार भागवताचार्य व शिवपुराण कथाकार ह भ प मारुती महाराज लातूरकर यांची उपस्थिती लाभणार असून दुपारी २ ते ५ या दरम्यान कथेचे आयोजन करण्यात आले असून त्यांच्या मधुर वाणीतून परळीकरांना प्रथमच या कथेचे श्रवण करण्याचा योग आला आहे. तसेच कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून १२ फेब्रुवारी रोजी रात्री ८ ते १० या वेळेत ह भ प भागवताचार्य सुरेंद्र महाराज उखळीकर यांचे तर दिनांक १३ फेब्रुवारी रोजी हभप भागवताचार्य बाळासाहेब महाराज लटपटे, दिनांक १४ फेब्रुवारी रोजी ह भ प लक्ष्मण महाराज कुंडगीर , दिनांक १५ फेब्रुवारी रोजी ह भ प माधव महाराज उखळीकर शिवरात्री निमित्त रात्री दहा ते बारा यादरम्यान कीर्तन आयोजित करण्यात आले आहे तसेच सोमवार दिनांक १६ फेब्रुवारी रोजी ह भ प चैतन्य महाराज उखळीकर यांचे दुपारी ११ ते १ काल्याचे किर्तन होईल व नंतर महाप्रसाद होईल. तरी परळी पंचक्रोशीतील भाविकांनी या सर्व धार्मिक कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आव्हान श्री संत सोपान काका महाराज मंदिर उखळीकर भजनी फळ परळी वैजनाथ यांच्यावतीने करण्यात आले आहे.



## संजय इंगोले यांच्या पुढाकाराने आहेर धानोरा येथे पशुपालन व पशुकल्याण

**आहेर धानोरा । प्रतिनिधी**

भारत सरकारच्या पशुपालन व दुग्धव्यवसाय विभागाच्या पुढाकाराने साजऱ्या करण्यात येणाऱ्या पशुपालन एवं पशु कल्याण जागरूकता माह अंतर्गत ५ फेब्रुवारी २०२६ रोजी आहेर धानोरा या गावात विशेष जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम कॉमन सर्व्हिस सेंटर (उडउ) च्या माध्यमातून यशस्वीपणे पार पडला.

सदर कार्यक्रमाचे आयोजन उडउ बीड अंतर्गत व्हीएलई संजय इंगोले यांच्या माध्यमातून करण्यात आले होते. कार्यक्रमाला गावातील पशुपालक, शेतकरी, युवक व नागरिकांची लक्षणीय उपस्थिती होती. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश पशुपालन, पशुसंवर्धन, पशु आरोग्य व पशुकल्याण या विषयांबाबत ग्रामीण भागात जनजागृती निर्माण करणे हा होता.

कार्यक्रमास उडउ बीड जिल्हा समन्वयक श्री. दिनेश जाधव यांचे मार्गदर्शन मिळाले केंद्र सरकारच्या पशुपालन क्षेत्रातील विविध योजना, पशुकल्याणाचे महत्त्व, आधुनिक पशुसंवर्धन पद्धती, लसीकरण, पशु आरोग्य तपासणी तसेच पशुपालकांच्या उत्पन्नवाढीसाठी उपलब्ध संधी याविषयी सविस्तर माहिती दिली. पशुपालन हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असून योग्य मार्गदर्शन व शासकीय योजनांचा लाभ घेतल्यास पशुपालकांचे आर्थिक जीवनमान उंचावू शकते, असे मत त्यांनी व्यक्त केले.

यावेळी उपस्थित नागरिकांना संजय इंगोले यांनी उडउ च्या माध्यमातून ग्रामीण भागात होणाऱ्या डिजिटल सेवा, शासकीय योजना व जनजागृती उपक्रमांची माहिती उपस्थितांना दिली.

## त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर जयंती डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यालयामध्ये उत्साहात संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

येथील आनंद मागासवर्गीय शिक्षण प्रसारक मंडळ बीड संचलीत, डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यालयामध्ये भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, प्रख्यात कायदे पंडित डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या सुविद्य पत्नी त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम प्रसिद्ध व्याख्याते आणि लेखक प्राचार्य यशवंत खडसे यांचे व्याख्यान व आंतरशालेय स्पर्धेचे बक्षीस वितरण आणि माता-पालक मेळावा आनंद



मागासवर्गीय शिक्षण प्रसारक मंडळ बीड या संस्थेचे अध्यक्ष बी.एस.धुतालमल तसेच संस्थेचे सचिव ॲड.व्ही.बी. मगर यांच्या अध्यक्षतेखाली व उत्तम पवार रमेश अंकुटे या विद्यालयाचे मुख्याध्यापक बी.ए. हावळे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये संपन्न झाला. कार्यक्रमाच्या प्रारंभी राजमाता जिजाऊ, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर, त्यागमूर्ती रमाई आंबेडकर आणि भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यार्थ्यांची प्रभात फेरी शालेय परिसरातून काढण्यात आली. याप्रसंगी आंतरशालेय पातळीवर आयोजित यशस्वी विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण प्रथम ३०१ रु., द्वितीय २०१ रु. आणि तृतीय १०१ रु. आणि प्रमाणपत्र देण्यात आले. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी स्वागतगीत आणि समूहनृत्य सादरीकरण केले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष बी.एस. धुतालमल यांनी प्रोत्साहनपर विद्यार्थ्यांना बक्षीस दिले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक बी.ए.हावळे, संचालन संतोष मेश्राम आणि श्रीमती एन.जी.मुंडे आणि आभार प्रदर्शन डब्ल्यू. एस वाघमारे यांनी केले. याप्रसंगी बहुसंख्य माता पालक प्रतिष्ठित नागरिक सेवानिवृत्त शिक्षक विजय देशमुख, प्रा.वसंत ओगले, आनंद छात्रालयाचे अधिक्षक डी. व्ही.खरसाडे, समर्थ गुरुकुलचे अधिक्षक रविराज घुले, शिक्षक पवळ यु.बी., आर.बी.घुले, श्रीमती नेहा गायकवाड, भारत कोळेकर, शिक्षकेतर कर्मचारी, बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.



*महाराष्ट्राचे उप-मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांच्या जन्म दिन निमित्त शेतकरी अभियान- आज दिन.०९.०२.२०२६ रोजी मातोश्री बहुउद्देशीय सेवाभावी संस्था बीड अंतर्गत गाव बिबी ता.लोणार जि.बुलढाणा येथे महाराष्ट्राचे लाडके उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांच्या जन्म दिन निमित्त शेतकरी अभियान राबविण्यात आले. यावेळी शेतकरी यांना राज्य सरकार अंतर्गत विविध योजना राबवल्या जातात या योजने बद्दल माहिती देण्यात आली, विविध उद्योग व आधुनिक शेती बद्दल माहिती देण्यात आली. यावेळी उपस्थित संस्थेचे सचिव तेजस पवार, तेजस्विनी पवार,रोहन डोळस, व गावकरी उपस्थित होते.*

## पाटील कुटुंबाने शिक्षणाची गंगा सर्वसामान्यांपर्यंत आणली: श्री नवनाथरावजी थोटे



**नेकनूर । प्रतिनिधी**

माऊली विद्यापीठ केज संचलित प्रमिलादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालय नेकनूर आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजना विभागाअंतर्गत वार्षिक शिबिराचे उद्घाटन करण्यात आले या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ढास डी.के. आणि प्रमुख मार्गदर्शक म्हणून माऊली विद्यापीठ केजचे कोषाध्यक्ष श्री. नवनाथरावजी थोटे यांची उपस्थिती होती. तसेच सफेपुर गावचे सरपंच माधव आहेर उपसरपंच विष्णू मेंगडे माजी सरपंच शहाजी घोडके व जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक साळुंके हे उपस्थित होते. सर्वप्रथम आकांक्षा आव्हाड या विद्यार्थिनीने स्वागत गीत गाऊन सुरुवात करण्यात आली या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी प्रा. इनकर व्ही. एस. यांनी केले प्रमुख मार्गदर्शक श्री नवनाथरावजी थोटे साहेब यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना असे म्हणाले की, पाणलोट व्यवस्थापन व शाश्वत विकासासाठी हा विषय आजपासून मौजे सफेपूर येथे चालू झालेला असून या अंतर्गत युवकांचे एकूणच भविष्यातील भारताच्या विकासातील योगदान व या योगदान अंतर्गत वाढत्या लोकसंख्येच्या गरजा पूर्ण करण्यासाठी पडीक पडलेल्या जमिनीचे व्यवस्थापन ही एक महत्त्वाची बाब असून समाज देश आणि जग यांच्या गरजा पूर्ण करत असताना युवकांची भूमिका हे महत्त्वाचे आहे त्या त्या काळात समाजाच्या गरजा पूर्ण करणे हे समाजाचे सदस्य म्हणून आपले कर्तव्य आहे आमच्या काळात श्री अशोकरावजी पाटील साहेब आणि खासदार सौ.रजनीताई पाटील साहेब या घराण्याने माऊली विद्यापीठाच्या माध्यमातून बीडच्या डोंगराळ व ग्रामीण भागात शैक्षणिक विकासाची गंगा सर्वसामान्यांच्या दारात नेली त्या माध्यमातून आज या गंगेचे स्वरूप विशाल झाल्याचे आपल्याला दिसून येते आम्ही त्याकाळी मौजे सफेपुरचे सरपंच शहाजी घोडके यांच्याकडे किती वेळा आलो त्यांनी वेळोवेळी या कार्यामध्ये पाटील घराण्याला या गावातून पाठिंबा दिला त्यामुळे या गावात शिक्षणाचा प्रसार व प्रचार झाला याच पद्धतीने नेकनूर पंचक्रोशीतून अनेक विद्यार्थी विद्यार्थिनी घडल्या वेगवेगळ्या पदावर आज कार्यरत आहेत आणि ही खरंतर पाटील घराण्याची दुर्दम्य इच्छाशक्ती आणि प्रयत्नांचा परिणाम असल्याचे दिसून येते याचप्रमाणे आजच्या युवकांनी देखील समाजाच्या शैक्षणिक सामाजिक व दैनंदिन गरजा ओळखून त्या पूर्ण करण्यासाठी पुढे आले पाहिजे जे आपल्याला मिळाले आहे ते आपल्या पुढच्या पिढीपर्यंत योग्य त्या गुणवत्तेने व पूर्णत्वाने गेले पाहिजे यासाठी युवकांनी प्रयत्न केले पाहिजेत आज ग्रामीण भागामध्ये व शहरी भागांमध्ये मुलांमध्ये एकूणच कुटुंब व्यवस्था संस्कार यांची जाणीव कमी झाल्याचे दिसून येते खरं तर हे पुढील समाजासाठी धोक्याची घंटा असून मुलांनी संस्कार हे देखील बांधून घेतले पाहिजे आणि आपले कर्तव्य समाजाचे घटक म्हणून केले पाहिजे तरच पुढचा समाज सुखी समृद्धी होईल व या शाश्वत विकासामध्ये युवकांची भूमिका मोलाचे ठरेल यात शंकाच नाही. श्री.नवनाथरावजी थोटे साहेब यांनी असे आपले मत व्यक्त केले.

अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. ढास डी.के. यांनी असे म्हणाले की, पाणलोट व पडीक जमिनीच्या शाश्वत विकासासाठी युवकांनी हिरहिरीने भाग घेतला पाहिजे शाश्वत विकास म्हणजे काय हे विद्यार्थ्यांना समजावून सांगितले व शाश्वत विकासासाठी आपण सर्वांनी सहभाग घेऊन सामाजिक विकास साधने गरजेचे आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम

महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

दैनिक
# मराठवाडा पत्र

● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● मंगळवार, दि. १० फेब्रुवारी २०२६ ●

## थोडक्यात...

### म.गा.ग्रा.रो.यो. अंतर्गत नवीन कामांना मान्यता बंद

**आमिषाला बळी न पडण्याचे गटविकास अधिकारी गोकुळ बागलाने यांचे आवाहन**

आष्टी । प्रतिनिधी

महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजना (म.गा.ग्रा.रो.यो.) अंतर्गत सध्या कोणत्याही नवीन कामांना प्रशासकीय मान्यता देणे बंद करण्यात आले आहे. यामध्ये जलसिंचन विहीर, शेततळे, शेळीपालन शेड, वृक्ष लागवड, फळबाग लागवड आदी सर्व कामांचा समावेश आहे. केंद्र शासनाकडून सदर कामांचे सांकेतांक (वर्क कोड) काढण्याची प्रक्रिया सध्या थांबविण्यात आल्यामुळे नवीन कामांना मंजुरी देता येणार नसल्याची माहिती पंचायत समिती आष्टीचे गट विकास अधिकारी गोकुळ बागलाने यांनी दिली आहे. या पार्श्वभूमीवर तालुक्यातील लाभार्थी व नागरिकांनी कोणत्याही आर्थिक प्रलोभनाला बळी पडू नये तसेच दलालांच्या आमिषाला आहारी जाऊ नये, असे स्पष्ट आवाहन गट विकास अधिकारी बागलाने यांनी केले आहे. याबाबत कोणीही पंचायत समिती आष्टी येथे कोणतेही प्रस्ताव दाखल करू नयेत, असेही त्यांनी आवाहन लाभार्थी व नागरिक यांना केले आहे.

### उच्च माध्यमिक प्रमाणपत्र व माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा कालावधीत कलम १६३ प्रमाणे मनाई आदेश

बीड । प्रतिनिधी

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परिक्षा दिनांक १० फेब्रुवारी २०२६ ते १८ मार्च २०२६ माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा आणि दि. २० फेब्रुवारी २०२६ ते दि. १८ मार्च २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आल्या आहेत. सदरील परीक्षा सुव्यवस्थीत पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून परीक्षा केंद्राच्या परिसरात जमाबंदी आदेश लागू करण्यात आले आहेत. परिक्षा शांततेच्या वातावरणात पार पाडण्यासाठी परिक्षा चालू असताना बाहेरच्या लोकांकडून उपद्रव होण्याची शक्यता असते. तसेच परिक्षा चालू असताना कॉपी पुरविण्याचा प्रयत्न करतात तसेच परिसरातील झेरॉक्स सेंटरचा कॉपी ▶▶ उर्वरित पान २ वर

## राजेंद्र मस्के यांच्या पुढाकाराने पाटोदा (बे)पंचक्रोशीतील भक्तांची मागणी पूर्ण...

# श्री दत्त मंदिराचे नवे रुप उजळले!

**पाटोदा बेलखंडी शिवारात साठवण तलावाला प्राधान्य देऊ : राजेंद्र मस्के**

बीड । प्रतिनिधी

पाटोदा बेलखंडी परिसरातील शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि कृषी सिंचन क्षमतेत वाढ घडवून आणण्यासाठी साठवण तलाव उभारणीला प्राधान्य दिले जाणार असल्याची माहिती राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी दिली. मस्के यांनी सांगितले की,



या परिसरातील शेती उत्पादनक्षमता वाढवण्यासाठी पाण्याचा शाश्वत स्त्रोत निर्माण करणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे आगामी काळात कचारवाडी शिवारात साठवण तलाव मंजूर करून घेण्यासाठी प्रशासनाशी सातत्याने पाठपुरावा केला जाईल. नगदी पिकांच्या शेतीतून शेतकऱ्यांचे उत्पन्न व जीवनमान उंचावण्यासाठी जलसिंचन सुविधा मजबूत करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले. आज लिंबागणेश जिल्हा परिषद गटातील पाटोदा (बेलखंडी) शिवारातील दत्तनगर येथील उंच टेकडीवरील श्रीदत्त मंदिराकडे जाणाऱ्या सिमेंट कॉंक्रीट पायऱ्यांचे बांधकाम पूर्ण झाले असून, या कामाचा लोकार्पण कार्यक्रम प्रसंगी उपस्थित लोकांसी संवाद साधला. महंत श्रीधर दादा जामोदेकर व राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या हस्ते भक्तिमय वातावरणात पार पडला. यावेळी भक्तिदास महाराज, माजी सरपंच अमोल बडगे, मंजूर फेडरेशनचे संचालक बद्रीनाथ जटाळ,यांच्या सह कार्यक्रमास ग्रामस्थ, पंचक्रोशीतील भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ‘आदित्य पॉलिटेक्निक’च्या विद्यार्थ्यांसाठी सामान्य मानसिक आरोग्य कार्यशाळा उत्साहात

**विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आदित्य शिक्षण संस्थेचा उपक्रम**

बीड । प्रतिनिधी

आदित्य शिक्षण संस्थेत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य देत शैक्षणिक, क्रीडा, सांस्कृतिक व सामाजिक क्षेत्रातील विविध उपक्रम सातत्याने राबवले जात आहेत. विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासासोबत व्यक्तिमत्त्व घडवण्यावर भर देत संस्था गुणवत्तापूर्ण शिक्षण देत आहे. याचाच एक भाग म्हणून व्यक्तिमत्त्व विकास व मानसिक आरोग्य या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा,



संचालक डॉ.आदित्य सारडा, संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. यावेळी संवेदना फेलो, आदित्य बिर्ला एज्युकेशन ट्रस्ट – एम पॉवर फाउंडेशन, बीड चे अतुल बडवे व अधिकार मित्र विधी सेवा प्राधिकरण चे मिथुन जोगदंड यांनी विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन करून त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकास व मानसिक आरोग्य विषयी ज्ञानात भर टाकली. आदित्य पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा या दृष्टिकोनातून डॉ. आदित्य सारडा यांच्या संकल्पनेतून आदित्य पॉलिटेक्निकचे प्राचार्य डॉ. राहुल खडके यांच्या अधिपत्याखाली पॉलिटेक्निक महाविद्यालयातील प्रथम वर्ष विभागाने शारीरिक आरोग्यासोबत मानसिक आरोग्य कसे सुदृढ होईल या विषयी कार्यशाळेचे आयोजन केले होते. मार्गदर्शन करताना मिथुन जोगदंड यांनी विद्यार्थ्यांना मानसिक आरोग्याचे महत्त्व, सकारात्मक दृष्टिकोन, आत्मविश्वास वृद्धी व व्यक्तिमत्त्व विकासासाठी उपयुक्त माहिती ▶▶ उर्वरित पान २ वर


## शनी मंदिराच्या प्रवेशद्वारावर जिल्हा अधीक्षकांकडून गोंधळ; भक्तांची गैरसोय

**प्रवेशद्वार अडवल्याने भाविकांना दर्शनासाठी प्रतीक्षा करावी लागली ;विश्वस्तांच्या अनुपस्थितीत स्थळ पाहणीचा प्रयत्न ; प्रक्रियात्मक नियमांचे उल्लंघन असल्याचा आरोप**

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील ऐतिहासिक शनी मंदिर देवस्थानाच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ दिनांक ९ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ४ ते ६.३० या वेळेत गोंधळाची परिस्थिती निर्माण झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या घटनेमुळे मंदिराचे दर्शन गेट नियोजित वेळेत उघडता न आल्याने अनेक भाविकांना दर्शनासाठी प्रतीक्षा करावी लागली, त्यामुळे भक्तांची मोठी गैरसोय झाली.

मिळालेल्या माहितीनुसार, शनी मंदिर देवस्थानाच्या जागेसंदर्भातील प्रकरण हे तीन महिन्यांपूर्वीच आदेशासाठी बंद (उर्श्रीशव



कामकाजासाठी छत्रपती संभाजीनगर येथे उपस्थित होते. अध्यक्ष व विश्वस्त मंडळाच्या अनुपस्थितीत मंदिराच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ लोकांचा जमाव जमवून गोंधळ घातल्याने परिसरात तणाव निर्माण झाल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. या घटनेमुळे भक्तांच्या धार्मिक भावना दुखावल्या असून देवस्थानच्या व्यवस्थापनाबाबत संभ्रम निर्माण झाला आहे. सदर संपूर्ण प्रकार मंदिराच्या ऑनलाईन उउढत कॅमेऱ्यांमध्ये कैद झाला असून संबंधित फुटेज वरिष्ठ अधिकाऱ्यांना दाखवण्यात आल्याची माहिती आहे. ▶▶ उर्वरित पान २ वर

## मच्छिंद्रनाथ संजीवन समाधी सोहळ्याच्या तयारीचा आढावा आमदार सुरेश धस यांच्या अध्यक्षतेखाली पूर्वनियोजन बैठक



आष्टी । प्रतिनिधी

सावरगाव मायंबा येथील श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ गडावर दरवर्षीप्रमाणे यंदाही मच्छिंद्रनाथ संजीवन समाधी सोहळा १८ मार्च रोजी मोठ्या भक्तिभावात साजरा होणार आहे. गुढीपाडव्याच्या पूर्वसंध्येला वर्षातून एकदाच ही संजीवन समाधी भाविकांच्या दर्शनासाठी खुली केली जाते. या पवित्र सोहळ्यासाठी देशाच्या कानाकोपऱ्यातून लाखो नाथभक्त उपस्थित राहत असतात.

या पार्श्वभूमीवर उत्सवाच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी सोमवारी देवस्थानचे विश्वस्त तथा आमदार सुरेश धस यांच्या अध्यक्षतेखाली पूर्वनियोजन बैठक पार पडली. या बैठकीस पोलीस, महसूल, आरोग्य, सार्वजनिक बांधकाम, वीज वितरण, पाणीपुरवठा तसेच इतर सर्व ▶▶ उर्वरित पान २ वर

## हेल्मेट सक्ती करणारे प्रशासन निकृष्ट रस्ताकाम करणाऱ्या कंत्राटदारांना पाठीशी घालत असल्याचा आरोप

**जिल्हाधिकारी कार्यालयासमोर हेल्मेट घालून लक्षवेधी सत्याग्रह आंदोलन: डॉ. गणेश ढवळे**

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा अपघातमुक्त करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने दुचाकीस्वारांसाठी हेल्मेट वापर सक्तीचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय निश्चितच स्वागतार्ह असला तरी, अपघातांची प्रमुख कारणे ठरणाऱ्या निकृष्ट व रखडलेल्या राष्ट्रीय महामार्गांच्या कामांकडे प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष



घेत दर्जेदार काम असल्याचे प्रमाणपत्र देत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. यामुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. प्रशासनाच्या दुटप्पी धोरणाविरोधात लक्षवेधी आंदोलन

या पार्श्वभूमीवर बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे मुख्य प्रचार प्रमुख डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांच्या नेतृत्वाखाली आज जिल्हाधिकारी कार्यालयासमोर हेल्मेट घालून लक्षवेधी सत्याग्रह आंदोलन करण्यात आले. आंदोलनादरम्यान प्रशासनाच्या दुटप्पी भूमिकेविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली आणि निकृष्ट रस्ताकाम करणाऱ्या कंत्राटदारांवर तसेच जबाबदार ▶▶ उर्वरित पान २ वर

## स्वातंत्र्य सैनिक स्व. सुर्यभान पवार स्मरणार्थ राज्यस्तरीय ग्रंथमित्र पुरस्काराने डॉ राजेंद्र सानप सन्मानित



बीड । प्रतिनिधी

परभणी जिल्हा ग्रंथालय संघाच्या ४८वे वार्षिक अधिवेशन पुर्णा येथे. स्वातंत्र्य सैनिक सुर्यभान पवार यांच्या स्मरणार्थ ग्रंथालय क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यां साठीचा राज्य स्तरीयग्रंथमित्र पुरस्कार २०२६या वर्षीचा पुरस्कार सार्वजनिक ग्रंथालय चळवळीत३५ वर्षांपासून स्वतःला वाहून घेणारे. सामाजिक,राजकीय,अध्यात्मिक क्षेत्रात सक्रिय सहभागी असणारे.बीड जिल्हा ग्रंथालय संघाचे माजी अध्यक्ष,मराठवाडा विभागीय ग्रंथालय संघाचे माजी कोषाध्यक्ष व सध्या महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे सदस्य डॉ राजेंद्र सानप यांना मराठवाडा विभागाचे सहायक ग्रंथालय संचालक सुनील हुसे साहेब यांच्या हस्ते ग्रंथमित्र पुरस्कार देवुन सन्मानित करण्यात आले.यावेळी राज्य ग्रंथालय संघाचे माजी अध्यक्ष प्राचार्य डॉ रामेश्वर पवार, मराठवाडा विभाग ग्रंथालय संघ अध्यक्ष खंडेराव सरनाईक,कार्यवाह राम मेकले,प्रा डॉ ▶▶ उर्वरित पान २ वर


## 'स्वाराती'त हजसाठी जाणाऱ्या भाविकांची वैद्यकिय तपासणी सुरु करा

**खा.बजरंग सोनवणे यांचे आरोग्यमंत्र्यांना निवेदन**

बीड । प्रतिनिधी


हज यात्रेसाठी जाणाऱ्या भाविकांच्या वैद्यकीय तपासणी प्रक्रियेत होत असलेल्या विलंबामुळे अंबाजोगाई व परिसरातील भाविकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. या पार्श्वभूमीवर बीड लोकसभा मतदारसंघाचे खा.बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय आरोग्य व कुटुंबकल्याण मंत्री प्रतापराव जाधव, महाराष्ट्र राज्याचे आरोग्य मंत्री प्रकाश अबिटकर यांच्याकडे लेखी निवेदन सादर करून तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

शासनाच्या निर्देशानुसार हज यात्रेसाठी जाणाऱ्या भाविकांची वैद्यकीय तपासणी स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय



व रुग्णालय, अंबाजोगाई येथे करण्यात येते. मात्र सध्या आरोग्य विभागामार्फत सुरू करण्यात आलेल्या ऑनलाईन नोंदणी प्रणालीसाठी आवश्यक असलेले आयडी व पासवर्ड केवळ जिल्हा शल्यचिकीत्सकाकडे आहे. यामुळे स्वारातीत यात्रेला जाणाऱ्या भाविकांची वैद्यकिय तपासणी करण्यासाठी असमर्थता दर्शवली आहे. त्यामुळे वैद्यकीय तपासणी प्रक्रिया सुरू होण्यास विलंब होत असून भाविकांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे.अंबाजोगाई शहर तसेच आजूबाजूच्या तालुक्यांतून यावर्षी सुमारे १०० हून अधिक भाविक हज यात्रेसाठी जाणार आहेत. अनेक भाविक वयोवृद्ध असून त्यांना जिल्हा रुग्णालयात वारंवार जावे लागत असल्याने शारीरिक व मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. जिल्हा रुग्णालयात आधीच मोठी गर्दी असून मर्यादित सुविधा असल्याने भाविकांची गैरसोय होत असल्याचे चित्र आहे. स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अंबाजोगाई येथे आवश्यक वैद्यकीय सुविधा, तज्ज्ञ डॉक्टर, मनुष्यबळ व प्रशासकीय क्षमता उपलब्ध असतानाही केवळ प्रशासकीय कारणांमुळे तपासणी प्रक्रिया रखडल्याची बाब खा.सोनवणे यांनी निवेदनात नमूद केली आहे. येथेच तपासणी सुरू केल्यास भाविकांना मोठा दिलासा मिळेल, असेही त्यांनी स्पष्ट केले. हज यात्रेची वैद्यकीय तपासणी ठरावीक कालमर्यादेत पूर्ण करणे आवश्यक असून विलंब झाल्यास अनेक भाविक यात्रेपासून वंचित राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे बीड जिल्ह्यास तातडीने ऑनलाईन नोंदणीसाठी आवश्यक आयडी व पासवर्ड स्वारातीला उपलब्ध करून देण्यात यावेत तसेच अंबाजोगाई येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात पूर्ववत पद्धतीने तपासणी सुरू करण्याचे निर्देश द्यावेत, अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी केली आहे.

## आजपासुन बारावी परीक्षा सुरू केंद्राच्या परिसरात १४४ कलम लागु



वडवणी । प्रतिनिधी

जिल्ह्यात माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा माहे फेब्रुवारी, मार्च, २०२६ मध्ये होत असून परीक्षेमध्ये गैरप्रकार टाळण्यासाठी, परीक्षा कॉपीमुक्त करण्याकरिता तसेच परीक्षा केंद्राच्या परिसरात शांतता तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जिल्हादंडाधिकारी अविनाश पाठक यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (२) अन्वये परीक्षा केंद्राच्या १०० मीटर परिसरात दि. १० फेब्रुवारी, २०२५ ते २५ मार्च, २०२६ या कालावधीत परिक्षेच्या वेळेच्या १ तास आगोदर ते परीक्षा संपेपर्यंतच्या कालावधीत परीक्षा केंद्राच्या परिसरात व परिक्षेचे साहित्य ठेवलेल्या ठिकाणी मनाई आदेश जारी केले आहेत. परिक्षा शांततेच्या वातावरणात पार पाडण्यासाठी परिक्षा चालू असतांना परीक्ष न देणारे विद्याथी आणि इतर काही घटक परिक्षा केंद्राच्या परिसरात परिक्षा चालू असतांना उपद्रव करित असतात. परिक्षा चालू असतांना कॉपी देण्याचा प्रयत्न करतात तसेच परिसरातील झेराक्स सेंटरचा कॉपी पुरविण्यासाठी दुरूपयोग होण्याची शक्यता लक्षातघेता परिक्षा देणा–य विद्यार्थ्यांना व परिक्षेसाठी नियुक्त अधिकारी, ▶▶ उर्वरित पान २